**नागरिकांची सनद प्रसिद्ध करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. : सनद २०१२/प्र.क्र.१६८/आस्थापना
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ४ ऑक्टोबर , २०१२.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ८ (१) (२) मधील तरतुदीनुसार प्रत्येक विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालय प्रमुखांना नागरिकांची सनद प्रसिध्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार विभागाची सुधारित नागरिकांची सनद दि.०७.५.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. तथापि, विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या विभागांतर्गत झालेल्या बदल्यांमुळे व विषयसूची मध्ये झालेल्या बदलामुळे विभागाची सुधारीत नागरीकांची सनद प्रसिध्द करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाची नागरिकांची सनद सोबत जोडलेल्या पुस्तिकेन्वये प्रसिध्द करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१२०९२७१६३९२८२७०० आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कि.रा.कुलकर्णी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

# **महाराष्ट्र शासन**

## नागरिकांची सनद

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (खुद्द) मंत्रालय,
मुंबई - ३२.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (२) मधील तरतूदीनुसार

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (खुद्द) मंत्रालय**
**नागरिकांची सनद**

**प्रस्तावना**

**सामान्य** प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.शाकानि, १००६/प्र.क्र.२३/२००६/१८ (र.व.का.) दि.३१/५/२००६ नुसार पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग असा नवीन मंत्रालयीन प्रशासकीय विभाग निर्माण करण्यात आला आहे. त्यानुसार या विभागाकडे खालीलप्रमाणे विषय सोपविण्यात आले आहेत.

**i) पर्यटन**

१. थंड हवेच्या ठिकाणांचा व सुटी शिबीरांचा विकास करणे.
२. ध्वनीप्रकाश कार्यक्रम.
३. महाराष्ट्र राज्याचा आर्थिकदृष्टया भरभराट होण्याच्या दृष्टीने पर्यटन क्षेत्राचा विकास करणे आणि राज्याच्या आर्थिक विकासामध्ये पर्यटनाचे योगदान वाढविणे.
४. एकात्मिक पर्यटनाचा विकास करण्याच्या दृष्टीने उद्दिष्टे तयार करणे आणि अस्तित्वात असलेल्या साधन सामुग्रीच्या परिक्रमेत वाढ करणे, किल्ले, सागरी पर्यटन, पर्यावरण आणि वन पर्यटन इत्यादी.
५. महाराष्ट्र राज्य पर्यटनाचा एकात्मिक भाग म्हणून राज्याचा वारसा, संस्कृती, कला, शिल्पे यांचा विकास करणे.
६. निसर्ग, संस्कृती, वारसा यांचे संरक्षण आणि संवर्धन यासाठी साधन संपत्तीचा प्रमाणबध्द उपयोग करुन घेणे.
७. पर्यटन स्थळांवरील साधनसामुग्रीचा विकास करणे आणि पर्यटन सुविधांमध्ये सुधारणा करणे.
८. विविध प्रदर्शने, मेळे आणि उत्सव यामधून महाराष्ट्रातील पर्यटन विषयक बाबींचे दर्शन घडविणे.
९. पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक पावले उचलणे.

**ii) सांस्कृतिक कार्य विभाग**

१. मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करणे, उत्कृष्ट चित्रपट निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे व त्यांना पुरस्कार देणे.
२. मराठी नाटय महोत्सव, महाराष्ट्र राज्य संगीत महोत्सव, महाराष्ट्र राज्य तमाशा महोत्सव व महाराष्ट्र राज्य नाटय महोत्सव यांचे आयोजन करणे.
३. सांस्कृतिक व मनोरंजन क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या विविध कलापथकांना व सांस्कृतिक संस्थाना सहायक अनुदान देणे.
४. महाराष्ट्रातील वृध्द साहित्यिक व कलाकार यांना वार्धक्यामुळे किंवा अपंगत्वामुळे स्वत:चा निर्वाह करता येत नाही अशा कलाकारांना, नाटयकलावंताना व साहित्यिकांना अर्थसहाय्य देणे.
५. भारत सरकारच्या वार्धक्य व एकात्मिकृत योजनेखाली कलाकारांना व लेखकांना अर्थसहाय्य देणे.
६. नाटय व संगीत क्षेत्रातील वृध्द किंवा मृत झालेल्या श्रेष्ठ संगीतकारांच्या जुन्या व दुर्मिळ असलेल्या ग्रामोफोन तबकडयांची ध्वनिफीत तयार करणे.
७. राष्ट्रीय नाटय महोत्सवामध्ये भाग घेण्यासाठी नाटय पथके पाठविणे.
८. नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात येणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळयात भाग घेण्यासाठी लोकनृत्य पथके पाठविणे.
९. नाटयगृहे बांधणे व नाटयप्रयोग तसेच विविध रंगमंचीय कलांना प्रोत्साहन देणे, त्यांचे जतन करणे इत्यादी बाबत धोरणात्मक निर्णय घेणे.
१०. महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातत्वीय स्थळे व अवशेष अधिनियम १९६० (१९६१ चा अधिनियम १२ वा) मधील कलम ३० व महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातत्वीय स्थळे व अवशेष नियम १९६२ मधील नियम ४५ ते ४९ यामधील तरतूदीनुसार राज्य संरक्षित स्मारकांचे जतन संवर्धन व संरक्षण करणे याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.
११. राज्य हिंदी/सिंधी/गुजराती अकादमी.
१२. महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयांचे मराठी व इंग्रजी भाषेत जिल्हा गॅझेटिअर प्रकाशित करणे.
१३. राज्य सरकारच्या अभिलेखांचे जतन व्यवस्थापन करणे, ऐतिहासिक महत्वाच्या अभिलेखांचे जतन, संपादन व सर्वेक्षण करणे याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.
१४. चित्रपट निर्मिती उद्योगास प्रोत्साहन देण्यासाठी, चित्रिकरण स्थळे निर्माण करणे यासाठी आधुनिक सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, गोरेगाव, मुंबई व कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर यांची निर्मिती करणे.
१५. रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ.
१६. विविध रंगमंचीय कला व इतर कलांचे संगोपन, जतन व संवर्धन करण्यासाठी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीची स्थापना, धोरणात्मक निर्णय घेणे.

राज्यातील पर्यटन स्थळांना प्रसिध्दी देऊन अशा ठिकाणी मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन त्याचा विकास करणे व त्याद्वारे राज्यातील पर्यटनास चालना देणे हे पर्यटन विभागाचे प्रमुख कार्य आहे. याचप्रमाणे राज्यातील सांस्कृतिक वारसांची लोकांना जाणीव व्हावी व त्याचे संरक्षण व संवर्धन व्हावे या दृष्टीने सांस्कृतिक कार्य विभागाकडून विविध योजना राबविण्यात येतात. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकांमध्ये भावनात्मक ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न या विभागामार्फत केला जातो.

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी व राज्य शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी या विभागांतर्गत खालील क्षेत्रीय कार्यालये व महामंडळ कार्यरत आहेत.

१. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ, मर्या. मुंबई
२. पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. पुराभिलेख संचालनालय, मुंबई
५. पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई
६. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, मर्या., दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई
७. दर्शनिका विभाग, मुंबई
८. रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, मुंबई
९. महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी
१०. महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी
११. महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमी

## २) विभागाची संरचना :

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या या प्रशासकीय विभागाकडून प्रामुख्याने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विषयक बाबींवर धोरणात्मक निर्णय घेतले जातात. शासन स्तरावर या विभागाचे प्रमुख माननीय प्रभारी मंत्री व माननीय राज्यमंत्री आहेत. प्रशासकीय पातळीवर अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव / सचिव हे विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव / सचिव यांच्या नियंत्रणाखाली सह सचिव, उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी व इतर कर्मचारी वर्ग कार्यरत आहे. तसेच या विभागाशी संबंधित कामकाज करण्यासाठी पुढील प्रमाणे विषयांचे वाटप व कार्यासनांची निर्मिती करण्यात आली आहे.

| कार्यासनाचे नाव | ठळक विषय | कार्यासन अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|
| सां.का.१ | १. चित्रनगरी-योजना व आस्थापना<br>२. रंगभूमि प्रयोग परिनिरिक्षण मंडळ-योजना व आस्थापना<br>३. चित्रपट महोत्सव<br>४. ऐतिहासिक चित्रपट अनुदान<br>५. सामाजिक चित्रपट अनुदान<br>६. नाटयगृह बांधण्यासाठी अनुदान | अवर सचिव /कक्ष अधिकारी<br>दूरध्वनी क्र.२२०२५६०८ | उप सचिव<br>दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |
| सां.का.२ | १. पुराभिलेख संचालनालय-योजना व आस्थापना<br>२. दर्शनिका विभाग-योजना व आस्थापना<br>३. पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी-योजना व आस्थापना<br>४. संतपीठ-योजना व आस्थापना | अवर सचिव /कक्ष अधिकारी<br>दूरध्वनी क्र.२२०२५६०८ | उप सचिव<br>दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |
| सां.का.३ | १. पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय-योजना<br>२. राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्याची कार्यवाही | अवर सचिव /कक्ष अधिकारी<br>दूरध्वनी क्र.२२०२६९०० | उप सचिव<br>दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३. राज्यात संरक्षित स्मारक कार्यक्रम परवानगी देणेबाबत<br>४. महाराष्ट्र - वैभव संगोपन योजना<br>५. पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय- आस्थापना | | |
| सां.का.४ | १. सांस्कृतिक कार्य संचालनालय - योजना व आस्थापना<br>२.हिंदी / गुजराती / सिंधी साहित्य अकादमीशी सर्व संबंधित बाबी | अवर सचिव/कक्ष अधिकारी<br>दूरध्वनी क्र.२२०४९९१२ | उप सचिव<br>दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |
| आस्थापना | १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (मंत्रालय खुद्द) आस्थापना विषयक सर्व बाबी.<br>२. नोंदणी शाखा<br>३. संगणक समन्वय शाखा<br>४. विभाग व क्षेत्रिय कार्यालयाचा वाहन आढावा व खरेदी प्रस्ताव<br>५. गोपनीय अहवाल | अवर सचिव / कक्ष अधिकारी<br>दूरध्वनी क्र.२२०२६९०० | उप सचिव<br>दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |
| समन्वय | १. विभागांतर्गत एक पेक्षा अनेक कार्यासनाशी संबंधीत कामकाजाचे समन्वय<br>२. विधानमंडळाशी निगडीत सर्व कामकाज समन्वय<br>३. विकाक प्रकरणांचा आढावा<br>४. प्रलंबित प्रकरणांचा आढावा<br>५. आश्वासनाचा आढावा | अवर सचिव /कक्ष अधिकारी<br>दूरध्वनी क्र.२२०२५६०८ | उप सचिव<br>दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |
| रोख | १. रोख शाखेशी संबंधित सर्व प्रकारच्या नोंदवहया अद्यावत ठेवणे<br>२. विभागातील अधिकारी/कर्मचारी वेतन अदा करणे,कार्यालयीन खर्चाची देयके अधिदान व लेखा अधिकारी कार्यालयास सादर करणे<br>३. अधिदान व लेखा कार्यालय/ महालेखापालाशी संबंधीत खर्चाचे ताळमेळ<br>४. लेखा परीक्षणाबाबत सर्व प्रकारची कामे<br>५. विभागातील अधिकारी / कर्मचारी सेवा पुस्तके | कक्ष अधिकारी<br>दूरध्वनी क्र.२२०२६९०० | उप सचिव<br>दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |
| अर्थसंकल्प | १. संपूर्ण विभागाच्या अर्थसंकल्प विषयक बाबींवरील कार्यवाही<br>२. लोकलेखा समिती<br>३. अंदाज समिती<br>४. महालेखापालांकडून प्राप्त होणाऱ्या सर्व अहवालातील कार्यवाही (उदा.विनियोजन लेखे, नागरी अहवाल, वाणिज्यिक अहवाल इ.)<br>५. सर्व वैधानिक समित्यांचे कामकाज<br>६. सांस्कृतिक धोरणाची अंमलबजावणी | अवर सचिव /कक्ष अधिकारी<br>दूरध्वनी क्र.२२०४९९१२ | उप सचिव<br>दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |

| | | | |
|---|---|---|---|
| पर्यटन | १. पर्यटन धोरण ठरविणे व त्याची अंमलबजावणी करणे.<br>२. पर्यटन विकासाच्या दृष्टीने पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे.<br>३. पर्यटन स्थळांना विहित दर्जा बहाल करण्याचे निकष ठरविणे, त्या अनुषंगाने कार्यवाही करणे.<br>४. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून विविध योजना राबवून घेणे व त्यांची आस्थापना. | अवर सचिव /कक्ष अधिकारी<br>दूरध्वनी क्र.२२०२६०२९ | उप सचिव<br>दूरध्वनी क्र.२२०२२७०२ |

**३.कार्यपुर्तीचे वेळापत्रक :**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांच्या कार्यपूर्तीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम ११ मध्ये नमूद केलेल्या न्यायप्रविष्ट बाबी, लोकआयुक्त किंवा उप लोकआयुक्त आणि अन्य घटनात्मक संस्था, आयोग, न्यायिकवत बाबी, केंद्र किंवा अन्य राज्य शासनांच्या संबंधातील प्रकरणे, विधी विधानांशी संबंधित बाबी, मंत्रिमंडळास सादर होणाऱ्या मुख्य धोरणात्मक बाबी इ.ना कार्यपूर्तीच्या वेळापत्रकातील स्तंभ क्र.३ येथील वेळापत्रकातून सूट राहील.

| कार्यासन क्रमांक | विभाग/कार्यासनाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| सां.का.१ | १. चित्रनगरी-योजना व आस्थापना<br>२. रंगभूमि प्रयोग परिनिरिक्षण मंडळ-योजना व आस्थापना<br>३. चित्रपट महोत्सव<br>४. ऐतिहासिक चित्रपट अनुदान<br>५. सामाजिक चित्रपट अनुदान<br>६. नाटयगृह बांधण्यासाठी अनुदान | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | अवर सचिव / कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र.२२०२५६०८ | उप सचिव दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |
| सां.का.२ | १. पुराभिलेख संचालनालय-योजना व आस्थापना<br>२. दर्शनिका विभाग-योजना व आस्थापना | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या | अवर सचिव / कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र.२२०२५६०८ | उप सचिव दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३. पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी-योजना व आस्थापना<br>४. संतपीठ-योजना व आस्थापना | कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | | |
| सां.का.३ | १. पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय-योजना<br>२. राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्याची कार्यवाही<br>३. राज्यात संरक्षित स्मारक कार्यक्रम परवानगी देणेबाबत<br>४. महाराष्ट्र - वैभव संगोपन योजना<br>५. पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय- आस्थापना | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | अवर सचिव / कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र.२२०२६९०० | उप सचिव दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |
| सां.का.४ | १. सांस्कृतिक कार्य संचालनालय - योजना व आस्थापना<br>२. हिंदी/गुजराती/सिंधी साहित्य अकादमीशी सर्व संबंधित बाबी | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या | अवर सचिव/ कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र.२२०४९९१२ | उप सचिव दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | नस्तीवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | | |
| आस्थापना | १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (मंत्रालय खुद्द) आस्थापना विषयक सर्व बाबी.<br>२. नोंदणी शाखा<br>३. संगणक समन्वय शाखा<br>४. विभाग व क्षेत्रिय कार्यालयाचा वाहन आढावा व खरेदी प्रस्ताव<br>५. गोपनीय अहवाल | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | अवर सचिव/ कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र.२२०२६९०० | उप सचिव दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |
| समन्वय | १. विभागांतर्गत एक पेक्षा अनेक कार्यासनाशी संबंधीत कामकाजाचे समन्वय<br>२. विधानमंडळाशी निगडीत सर्व कामकाज समन्वय<br>३. विकाक प्रकरणांचा आढावा<br>४. प्रलंबित प्रकरणांचा आढावा<br>५. आश्वासनाचा आढावा | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | अवर सचिव / कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र.२२०२६९०० | उप सचिव दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |
| रोख | १. रोख शाखेशी संबंधित सर्व प्रकारच्या नोंदवहया अद्यावत ठेवणे<br>२. विभागातील अधिकारी/कर्मचारी वेतन अदा करणे,कार्यालयी खर्चाची देयके अधिदान व लेखा | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या आणि | कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र.२२०२६९०० | उप सचिव दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अधिकारी कार्यालयास सादर करणे<br>३. अधिदान व लेखा कार्यालय/महालेखापालाशी संबंधीत खर्चाचे ताळमेळ<br>४. लेखा परीक्षणाबाबत सर्व प्रकारची कामे<br>५. विभागातील अधिकारी / कर्मचारी सेवा पुस्तके | तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | | |
| अर्थसंकल्प | १. संपूर्ण विभागाच्या अर्थसंकल्प विषयक बाबींवरील कार्यवाही<br>२. लोकलेखा समिती<br>३. अंदाज समिती<br>४. महालेखापालांकडून प्राप्त होणाऱ्या सर्व अहवालातील कार्यवाही (उदा.विनियोजन लेखे, नागरी अहवाल, वाणिज्यिक अहवाल इ.)<br>५. सर्व वैधानिक समित्यांचे कामकाज<br>६. सांस्कृतिक धोरणाची अंमलबजावणी | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | अवर सचिव / कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र.२२०४९९१२ | उप सचिव दूरध्वनी क्र.२२०२५६०९ |
| पर्यटन | १. पर्यटन धोरण ठरविणे व त्याची अंमलबजावणी करणे.<br>२. पर्यटन विकासाच्या दृष्टीने पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे.<br>३. पर्यटन स्थळांना विहित दर्जा बहाल करण्याचे निकष ठरविणे त्या अनुषंगाने कार्यवाही करणे.<br>४. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून विविध योजना राबवून घेणे व त्यांची आस्थापना. | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | अवर सचिव / कक्ष अधिकारी दूरध्वनी क्र.२२०२६०२९ | उप सचिव दूरध्वनी क्र.२२०२२७०२ |

**४. नियम / शासन निर्णय**

राज्यात पर्यटन क्षेत्राच्या विकासास चालना देण्याच्या हेतुने महाराष्ट्र शासनाने रु.२५ कोटी इतके अधिकृत भांडवल असलेले महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची कंपनी अधिनियम १९५६ अन्वये स्थापना केलेली आहे. भांडवलाचा भरणा महाराष्ट्र शासनाने केला आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांची माहिती व त्यांचेकडून राबविण्यांत येणाऱ्या विविध कार्यक्रमाची व दिल्या जाणाऱ्या सुविधांची माहिती www.maharashtratourism.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

राज्यात चित्रपटसृष्टीसाठी विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने व मराठी चित्रपटांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या. ही कंपनी अधिनियम १९५६ अन्वये स्थापन केली आहे. सदरहू महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु.१५ कोटी इतके असून संपूर्ण भांडवलाचा भरणा राज्य शासनाने केलेला आहे. महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या., दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई यांची माहिती व त्यांचेकडून राबविण्यांत येणाऱ्या विविध कार्यक्रमाची व दिल्या जाणाऱ्या सुविधांची माहिती www.filmcitymumbai.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण जाहीर करण्यात आले असून ते महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in प्रसिध्द करण्यात आले आहेत. या विभागाच्या अधिपत्याखालील दर्शनिका विभागाने तयार केलेले राज्यातील जिल्हयांचे Gazetteers महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in प्रसिध्द करण्यात आले आहेत.

पर्यटन विषयक व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील विविध क्षेत्रीय कार्यालयाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांच्या माहितीचा समावेश व त्यासाठीची आर्थिक तरतूद इ.चा तपशील विभागाच्या कार्यक्रम अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात येतो.

५. **(अ) गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण**

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्यासंबंधी परिच्छेद -३ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविता येईल. सदर तक्रारींची पुर्तता करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहील. यानंतरही नागरिकांचे समाधान न झाल्यास नागरिकांना आपली तक्रार या विभागाच्या अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांच्याकडे करता येईल.

**(ब) जनसामान्यांकडून सूचना**

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील.

----------